24

# परित्यक्ता महिलांचा आधार : स्वंय सहायता गट

**डॉ.शोभा भानुदासराव दुधाटे**
संत तुकाराम महाविद्यालय,परभणी

**प्राचार्य मेजर डॉ.निर्मला एस कोरे**
महात्मा जोतीबा फुले महाविद्यालय,
मुखेड, जि.नांदेड

प्रस्तावणा :-

साठोत्तरी स्वातंत्र्ये गाठलेल्या भारतात संख्यात्मक दृष्टया अर्धा वाटा असलेल्या स्त्रियांच्या प्रश्नात काही बाबतीत वाढ होत चाललेली दिसते . उदा. महिला सुरक्षा, विधवा महिलांच्या समस्या, हुंडा बळी, परित्यक्ता महिला इत्यादी. अशा अनेक समस्या असलेल्या महिलांपैकी परित्यक्ता महिलांची अवस्था अत्यंत दयनिय आहे(दोनो घरसे व पराई). अशा महिलांना **सांत्वन,सन्मान व समाधान** या सुत्राचा वापर अत्यंत गरजेचा आहे. समाजामध्ये हुंडाबळी ठरलेल्या व आत्महत्या केलेल्या महिलांना वरिल सुसूत्रता मिळाली असती तर कदाचीत त्यांचे प्रमाण कमी झाले असते.

महिला आणि आर्थिक साक्षरतेचा विचार केला असता नोबेल पुरस्कार विजेते प्रो.मोहमद युनूस यांच्या 'बँकर टू द पुअर' या पुस्तकातील त्याचे आर्थिक क्रांतीकारी विचार महत्वाचे वाटतात. त्यातील काही पुढिल प्रमाणे.

१. दारिद्रय, बेरोजगारी,आर्थिक आणि सामाजीक विषमता याचा सर्वाधिक फटका महिलांनाच बसतो.
२. एकदा स्त्री च्या हातात आर्थिक नाडया दिल्या की तिची कुटुंबा मध्ये माणुस म्हणून जगण्याची सुरूवात होते.
३. ग्रामिण बँकेने दिलेले सुक्ष्म कर्ज केवळ भुकेपासून व दारिद्रया पासून मुक्त करते असे नव्हे तर त्या व्यक्तीस गुलामगिरीतून ही मुक्तता देते.

वरिल वक्तव्यावरून असे लक्षात येते की, महिलांना आर्थिक अधिकार नसल्यामुळे त्यांच्या घटस्फोटचे व परावलंबत्वाचे प्रमाण वाढत आहे.

**शोध निबंधाचा उद्देश:-**

१. परित्यक्ता महिलांचे प्रमाण जानणे.
२. परित्यक्ता महिलांचे शैक्षणिक गुणवत्ता तपासणे.
३. स्वंय सहायता मध्ये सामावून घेणे.
४. किमान कौशल्यावर आधारित प्रशिक्षण देणे.

**संशेधनाचे महत्व :-**

सुप्त कौशल्य असलेल्या आणि जगण्याचा अधिकार हिरमुसलेल्या बळांचा (कौशल्याचा) वापर करून स्वावलंबत्व निमाण करणे अणि विकास प्रक्रियेमध्ये गुणात्मक दर्जा वाढवणे महत्वाचे आहे.

**अभ्यास क्षेत्र :-**

परभणी जिल्हयातील पुर्णा तालुक्यातील देऊळगाव (दु) या गावातील परित्यक्ता महिलांचा पथदर्शी (Pilot Study) अध्ययन केले आहे.

**संशोधनाच्या मर्यादा :-**

वय १६ ते ४० वर्षे असलेल्या महिलांचा समावेश प्रस्तुत शोध निबंधामध्ये केला आहे. अशा महिलांची संख्या ३० ते ३२ आहे.

**तथ्य विश्लेषण :-**

निवडलेल्या परित्यक्ता महिलांचे शैक्षणिक गुणवत्ता माध्यमिक स्तरापर्यंतचीच आहे. परित्येक्ता महिलांसाठी **सांत्वन,सन्मान व समाधान** या सुत्राचा वापर करुन स्थानिक पातळीवर त्यांना संघटीत करणे महत्वाचे आहे. त्यासाठी ग्रामपंचायत, पंचायत समिती, नगर पालिका आणि महानगर पालिका अशा ठिकाणी त्यांची अधिकृतरित्या नोंद होणे महत्वाचे आहे. त्यांना दारिद्रय रेषेखालिल

दाखवणे महत्वाचे आहे. महाराष्ट्र राज्यात दारिद्रय निर्मुलनासाठी स्वर्णजयंती, ग्राम स्वरोजगार ७५% केंद्र पुरस्कृत योजना सन १९९९ पासून राबवण्यात येत आहे. सन १९९९ ते २०११ पर्यंत या योजने अंतर्गत एकूण २,५४,६७३ स्वंय सहायता गट स्थापन झाले असून त्यातील ७१,७१३ गटांनी विविध उपक्रम सुरू केले आहेत. पैकी प्रथम वर्गवारी प्राप्त झालेले गट १,८४,६९७ इतके असून द्वतिय वर्गवारी ९८,५४४ गटांनी प्राप्त केली आहे. ही योजना सुरू झाल्यापासून सुमारे २,७०,००० कुटुंबे दारिद्रय रेषे खालुन रेषेवर आले आहेत.

स्वर्ण जयंती ग्राम स्व रोजगार निमित्त उपरोक्त उपक्रम पार पडत असला तरी परित्यक्ता महिलांसाठी मात्र उपहासात्मक स्थिती आहे. त्यांच्या समोर स्वंय सहायता गटात येण्यासाठी काही अडचणी आहेत त्या पुढिल प्रमाणे.

१. यापुर्वी त्यांच्या सासरी गट स्थापन झालेला आहे परंतु पतीने टाकल्यामुळे त्याच नावे दुसरा गट स्थापन करणे अडचणीचे आहे.
२. लग्नानंतर माहेरच्या नावाचे कोणतेही ओळख पत्र नसल्या मुळे माहेरची रहिवासी दाखवणे ही ग्राहय नाही.
३. बहुतांशी महिलांवर आपल्या पाल्याची जबाबदारी असल्याने स्वंय सहायता गटात बचत करणे आवघड जाते.
४. माहेरच्या मंडळीत आल्यानंतर घरातील प्रमुखाच्या विचाराधिन तिला वागावे लागते.
५. गटामधील बँकिंग क्षेत्र स्वतः महिलेने हाताळले पाहिजे हा नियम कुटुंब प्रमुखाला जाचक वाटतो.

अशा अव्हानात्मक बाबी परित्यक्ता महिलांना बचत गटामध्ये येण्यासाठी कुंपनात्मक ठरत आहे. त्या साठी स्वंयसेवी संस्था, सहकारी संस्था, निम सहकारी संस्था, राजकिय पक्ष यांच्या पाठिंब्यामुळे वरिल आडचणीवर मात करून त्या महिलांना सामावून घेता येते.

उपाय योजना :-

१. परित्यक्ता म्हणून नोंदनी महत्वाची आहे.
२. ज्या स्त्रियांना रोजंदारीचे स्त्रोत अद्याप प्राप्त झाले नाहीत अशा स्त्रियांचा स्वंसेवी संस्था अल्प बचत मासिक हप्ता भरेल.
३. तिची आरोग्य तपासणी, औषधोपचार, मुलांचे शिक्षण इत्यादी मुलभूत अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थे द्वारे मिळतील.
४. बँकिंग व्यवहार समजे पर्यंत प्रशिक्षीत सोबत असतील नंतर मात्र स्वतः करावे लागते.
५. जमा झालेल्या रकमे वरिल रक्कम उचलून विशिष्ट कालावधीसाठी वैयक्तीक बाबीवर खर्च करता येइल परंतु नंतर मात्र व्यवसाय निर्मितीसाठी वापरावी लागेल.

**निष्कर्ष :-**

अशा प्रकारची उपाय योजना दर्शविल्यानंतर ग्रामिण भागात काही लघु उद्योग विकसित होउ शकतात. शेतीतून मिळणाऱ्या उत्पादनावर प्रक्रिया करून कौशल्याने व्यवसाय वृध्दी होउ शकते दुग्ध व्यवसाय, दाल मिल, लोणचे, शेवाया, पापड इत्यादी तर काही अद्ययावत व्यवसाय विकसित होउ शकतात पैकी गारमेंटस् , ज्वेलरी डिझायनिंग, प्युअर वॉटर सप्लायर, सॅनिटरी नॅपकिन्स् , अगरबत्ती, फ्रुट प्रोसेसिंग, फुल मळे इत्यादी तर काही शासकिय पातळीवर सुरू असलेल्या स्वस्त धान्य दुकान , रॉकेल विक्र परवाना, शालेय आहार वाटप, गणवेश वाटप इत्यादी.

बचत गटांना केवळ व्यवसाय उभे करुन चालत नाही तर त्याची बाजारपेठ , कच्या मालाची उपलब्धता, दळणवळणाचे साधने , इत्यादी गोष्टीचे नियोजन , व्यवस्थापन, नियंत्रन आणि संघटीकरण होणे महत्वाचे आहे. असे झाले तर परित्यक्ता महिलांचा खराखुरा अधार स्वंय सहायता बचत गट होइल.

**संदर्भ :-**

१. यशाचा त्रिवेणी संगम, उद्योगिनी विकास प्रशिक्षण कार्यक्रम पत्रीका.
२. यशस्विनी विश्‍व , यशस्विनी सामाजीक अभियान,विशेषांक, दिपा देशमुख.
३. समाज शास्त्र, संशोधन पत्रिका ,डिसेंबर २०१०.
४. विरेंद्र प्रकाश शर्मा लिखीत समकालिन भारत में सामाजीक समस्याएँ, पंचशिल प्रकाशन जयपूर.
५. ग्राम सर्वेक्षण, ग्राम पंचायत अहवाल, देऊळगाव (दु).